पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय

# सभावृत्तांत

(इ क्षेत्रीय समितीची मासिक सभा)

दिनांक : ०२/०८/२०१९ वेळ: सकाळी ११.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची माहे ऑगस्ट २०१९ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०२/०८/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/ नगरसदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.बुर्डे सुवर्णा विकास | - | **अध्यक्षा** |
| २) मा.डोळस विकास हरिश्चंद्र | - | सदस्य |
| ३) मा.गायकवाड निर्मला मनोज | - | सदस्या |
| ४) मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी | - | सदस्य |
| ५) मा.बारसे प्रियांका प्रविण | - | सदस्या |
| ६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे | - | सदस्या |
| ७) मा. अँड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे | - | सदस्य |
| ८) मा.बुर्डे अजित प्रताप | - | स्विकृत सदस्य |
| ९) मा.साधना सचिन तापकीर | - | स्विकृत सदस्या |
| १०) मा.लांडे विजय नामदेव | - | स्विकृत सदस्य |

या शिवाय मा.श्रीनिवास रामचंद्र दांगट - क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.श्री.प्रविण घोडे – कार्यकारी अभियंता विद्युत, मा.श्री.पवार आर.एस.-कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा, मा.श्री.प्रदिप पुजारी- कार्यकारी अभियंता ज.नि., मा.श्री.वसंत उगले-लेखाधिकारी, मा.श्री.साळुंखे जे.जी.- मुख्याध्यापक मा.वि.भोसरी, मा.श्री.पी.आर.गायकवाड – मुख्याध्यापक लांडेवाडी विद्यालय, श्री.एस.व्ही.बगाडे-सहाय्य उद्यान अधिक्षक, श्री.टी.डी.गायकवाड-हार्टी. पर्यवेक्षक, श्री.राजेश नंदलाल भाट – सहा.आरोग्याधिकारी, सौ.भोज जे.एस.- क्रिडा पर्यवेक्षक, डॉ.अरूण दगडे-पशुवैद्यकीय अधिकारी, श्री.बोरावके डी.एच.-उपअभियंता (स्थापत्य), श्रीम.प्रेरणा शिनकर – उपअभियंता स्थापत्य, श्री.वहीकर एस.एस.-उपअभियंता पाणीपुरवठा, श्री.लांडे बी.पी. उपअभियंता विद्युत, श्री.दिनेश फाटक-कनिष्ठ अभियंता पा.पु., श्री.गणबोटे ए.पी.-क.अभियंता स्थापत्य, श्री.कुलकर्णी रत्नाकर.-कनिष्ठ अभियंता पा.पु., श्री.पांचाळ बी.के-क.अभियंता, श्री.शेलार ए.बी. -क.अभियंता ज.नि., श्री.निखील फेंडर-क.अ. स्थपत्य उद्यान, श्री.व्ही.एम.ताकवले क.अभियंता (स्थापत्य.), श्रीम.वृषाली पोतदार क.अभियंता (स्थापत्य), श्री.सुरेश कोंढरे – कार्यालय अधिक्षक अतिक्रमण, श्री. सतिश लांडगे- अतिक्रमण निरीक्षक, श्री.विनय जगताप-स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, इत्यादी अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

(उपस्थित सन्मा. नगरसदस्य/ सदस्या व अधिकारी यांचे मार्फत मा.सभापती सौ.सुवर्णा विकास बुर्डे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या, तसेच मा.सौ.निर्मला गायकवाड व मा.श्री.सागर गवळी यांची शिक्षण समिती सदस्यपदी नियुक्ती झालेबाबत मा.सभापती, क्षेत्रीय अधिकारी व उपस्थित सन्मा. नगरसदस्य/ सदस्या व अधिकारी यांचे मार्फत अभिनंदन करण्यात आले.)

मा.सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/ नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करून सभा सूरू करणेस अनुमती दिली.

मा.सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात समाविष्ट करण्यात आले.

विषय क्रमांक १ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
चऱ्होली येथील चौकाचे नामकरण करणेबाबत.

विषय क्रमांक २ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
म.रा.वि.वि.कंपनीचे भूमिगत केबल, फिडर पिलर व साहित्य मनपा मार्फत बदलणेबाबत.

अ) दिनांक ०५/०७/२०१९ रोजी घेणेत आलेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ३) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | १० | विषय क्रमांक | : | ०१ |
| दिनांक | : | ०२/०८/२०१९ | विभाग | : | नगर रचना/ शहर सुधारणा |
| सुचक | : | मा. नितीन लांडगे | अनुमोदक | : | मा.सोनाली गव्हाणे |

संदर्भ मा. नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे दिनांक ०७/०६/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे भोसरी येथील सर्व्हे नं. ६८१/३ सीटीएस नं. ३४०० मधून असणाऱ्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका मंजूर विकास आराखड्यानुसार स्पॉट झोनिंग (औद्योगिक/ रहिवाशी) आहे. सदर स्पॉट झोनिंग मधील औद्योगिक व रहिवाशी नागरीकांसाठी दळणवळण तसेच औद्योगिक मालाची ने आण करणेकामी सदर रस्त्याची तात्काळ आवश्यकता आहे. सदर रस्ता नकाशात अधोरेखित असून सदर रस्ता २०५ अन्वये विकसित झाल्यास महानगरपालिका व नागरिक आणि औद्योगिकरणाची अडचण दूर होणार आहे. सदर रस्ता उत्तरेपासून दक्षिणेकडे अर्धवट स्थितीत असल्याने २०५ अन्वये विकसित करणे क्रमपात्र होईल. त्यामुळे सदर रस्ता महानगरपालिका अधिनियम २०५ अन्वये घोषित करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ११ | विषय क्रमांक | : | २ |
| दिनांक | : | ०२/०८/२०१९ | विभाग | : | स्थापत्य, इ क्षेत्रिय कार्यालय |
| सुचक | : | मा. सागर गवळी | अनुमोदक | : | मा. निर्मला गायकवाड |

संदर्भ मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०२/०८/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे चऱ्होली येथील पुणे-आळंदी ते चऱ्होली फाटा चौकास "धर्मवीर छत्रपती श्री.संभाजी महाराज चौक" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | १२ | विषय क्रमांक | : | ३ |
| दिनांक | : | ०२/०८/२०१९ | विभाग | : | विद्युत |
| सुचक | : | मा. सुवर्णा बुर्डे | अनुमोदक | : | मा. विकास डोळस |

संदर्भ मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०२/०८/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मनपाचे इ क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात विविध रस्त्यावर विकास कामे व दुरुस्तीची कामे करणेत येत आहेत. यामध्ये स्थापत्य / पाणीपुरवठा/ जलनि:सारण विभागाकडून रस्त्याची खोदाई करतांना म.रा.वि.वि.कंपनीच्या भुमिगत केबल्स नादुरूस्त होतात. त्यामुळे नागरीकांच्या घरातील तसेच परिसरातील वीजप्रवाह खंडीत होऊन नागरीकांची गैरसोय होत आहे. तसेच रस्त्यावरील फिडर पिलर नादुरूस्त/ उघडे असल्याने अपघात होत आहेत. म.रा.वि.वि.कंपनीकडे सदर कामासाठी मागणी केली असता केबल, फिडर पिलर व साहित्य उपलब्ध नसल्याचे कारणाने अनेक दिवस वीजपुरवठा बंद रहात असून नागरीकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.
मनपामार्फत केबल, फिडर पिलर व साहित्य बदलणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर उपस्थितांचे आभार व्यक्त करून मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(सुवर्णा बुर्डे)
अध्यक्षा, इ प्रभाग समिती

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

जा.क्र.इक्षेका/ १/कावि/ २९६ /२०१९
दिनांक : २० /०८ /२०१९

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
सभावृत्तांतातील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली.**

मा.सुवर्णा बुर्डे - मागील बैठकीत विद्युत विषयक ज्या सूचना दिलेल्या आहेत त्याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही संबंधित विभागामार्फत करण्यात आलेली नाही.
वडमुखवाडी, चोविसावाडी भागात दररोज लाईट जाते. मोशी गंधर्वनगरी भागात नळ व ड्रेनेजची कामे करीत असतांना विद्युत केबल तुटलेल्या आहेत.

मा.प्रियांका बारसे - अमृत योजने अंतर्गत पाणी लाईन टाकणे, ड्रेनेज लाईन टाकणेत आल्या आहेत. परंतु सदर ठिकाणीचा राडारोडा अद्याप उचललेला नाही. बरेच ठिकाणी रत्यावरच राडारोड पडलेला आहे. जुनी लाईन काढेली अजून त्याच ठिकाणी पडून आहे. नळ कनेक्शन बरोबर जोडण्यात आले नाहीत, बऱ्याच ठिकाणी नळ लिकेज होत आहेत. काही लोकांनी नवीन कनेक्शन जोडले नाहीत. दोन्ही लाईन चालू आहेत म्हणून पाणी पुरवठा कमी दाबाने येत आहे. गवळीनगर मध्ये कनेक्शन लिक होत आहेत. जुने स्ट्रीट लाईट बंद आहेत. याबाबत मा.आयुक्त यांचेकडे पत्रव्यवहार केलेला आहे. शहरास पाणीपुरवठा होणारे धरण ९० टक्के भरले आहे, तरी ही पाणी कपात चालूच आहे. ती रद्द करणे बाबत संबंधित विभागाने पत्र व्यवहार करावा. पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम जेथे बाकी आहेत ती पूर्ण करून घ्यावीत.

मा.सागर गवळी - अमृत योजनेअंतर्गत केलेल्या कामामुळे विद्युत केबल डॅमेज झालेली आहेत. सदरचे केबल बदली करणे आवश्यक आहे. तसेच फिडर पिलर बदलण्याची कामे करणेही आवश्यक आहे. त्यसाठी लागणा-या आवश्यक रकमेची तरतुद करणेत यावी. लाईट गेल्यामुळे नागरीक खूप तक्रारी करीत असतात. पाणीपुरवठा सुरु झाला की लाईट जाते, त्यामुळे नागरीक खूप परेशान होतात. सोसायट्यामध्ये पाण्याच्या टाक्या भरण्यास अडचणी निर्माण होतात. आळंदी रोडवर लाईटची खूप समस्या आहे. त्याकरीता केबल बदलणे खूप गरजेचे आहे. लाईट गेल्यावर नागरीकांचे फोन येतात, रात्रीचे वेळी एमएसईबी चे कार्यालयात जावून तक्रारी कराव्या लागातात. अंधाराचा फायदा घेवून काही भागात आडऊन मारामारी करण्याचे प्रकार घडत आहेत. शास्त्रीनगर भागात स्ट्रिट लाईट देखील बंद आहेत.

फिडर बॉक्स फुटपाथला चिटकून आहेत. येथे अपघात होऊ नये म्हणून आगोदरच काळजी घेण्यात यावी. एमएसईबीची कामे मनपाचे वतीने करण्याबाबत प्रभाग समितीत ठराव करण्यात यावा. नागरीकांची कामे करणे ही आपली जबाबदारी आहे. ते कशा पध्दतीने करायचे याबाबत अधिकाऱ्यांनी नियोजन करावी.
साईनाथ कॉलनीमध्ये नळास पाणी आले की लाईट जाते.

श्री.घोडे - केबलचे काम हे विद्युत महावितरण कंपनीचे असलेने ते आपणास करता येत नाही.

मा. विकास डोळस - बोपखेल भागात ड्रेनेजची कामे चालू आहेत परंतु अद्याप पूर्ण झालेली नाहीत.
गणेशनगर भागात ड्रेनेज लाईन जोडलेल्या नाहीत. लोकांचे घरात ड्रेनेजचे पाणी येत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी याची पाहणी करावी.

कार्यकारी अभियता - सदर कामास एक वर्षाची मुदत असून वर्षभरात ते पूर्ण करायचे आहेत.